महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२२८५०४७१ Email ID:directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./३८९९/IEC/२०२१ दिनांक :- २९/०३/२०२१

प्रति,
कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय:- घरकुल मार्ट व कॉप-शॉपच्या लोगो (परिचय चिन्ह) वापराबाबत.**

संदर्भ:-१. ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णयक्र.प्रआयो-२०२०/ प्र.क्र.१०७/योजना-१०, दिनांक १९/११/२०२०
२. राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या अभियान अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना दि. २०/११/२०२०
३. ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णयक्र.प्रआयो-२०२०/ प्र.क्र.१०७/योजना-१०, दिनांक २५/०२/२०२१

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १ व ३ अन्वये राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माणयोजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी दि. २० नोव्हेंबर, २०२० पासून “महा आवास अभियान-ग्रामीण” राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये अभियानाच्या अंमलबजावणीसाठी या कार्यालयाकडून मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. यातील घरकुल मार्ट व कॉप-शॉप या उपक्रमांबाबत पुढील सूचना देणेत येत आहेत.

**१) घरकुल मार्ट** – राज्यातील सर्व ग्रामीण आवास योजनांच्या कामांना गति देण्यासाठी सर्व घरकुल बांधकाम साहित्य जसे- दगड, विटा, वाळू, सिमेंट, स्टिल, छताचे साहित्य, इ. एका जागेवर मिळण्यासाठी घरकुल मार्टची संकल्पना मांडली आहे. या संकल्पनेतून राज्यात महिला बचत गटांच्या सहभागाने घरकुल मार्ट सुरू करण्यात आले आहेत. अभियान कालावधीत या उपक्रमाला सर्व स्तरावरून सक्रीय सहभाग मिळत आहे.

या कार्यालयाच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेल्या घरकुल मार्टची बाजरपेठ व जनतेत वेगळी ओळख निर्माण व्हावी व राज्यात त्यांचा एक ब्रॅन्ड तयार व्हावा याकरीता या कार्यालयाने घरकुल मार्ट करीता लोगोची निर्मिती केली आहे.

**२) विक्री केंद्र/कॉप-शॉप (Co-op Shop)** — राज्यातील सर्व ग्रामीण आवास योजनेतील लाभार्थ्यांच्या/महिला बचत गटांच्या उत्पादनांना व्यासपीठ मिळण्यासाठी विक्री केंद्र/कॉप-शॉप (Co-op Shop) ची संकल्पना मांडली आहे. घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यास प्रत्येत पंचायत समिती आवारात एक याप्रमाणे डेमो हाऊसेस पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. अभियान कालावधीत मोठ्या प्रमाणात डेमो हाऊसेस बांधकाम सुरु झालेले असून येत्या कालावधीत सर्व डेमो हाऊसेस पूर्ण होतील.

CO-OP SHOP

बांधकाम पूर्ण झालेल्या डेमो हाऊसचा उपयोग लाभार्थ्यांना दाखविण्यासोबतच त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी व्यासपीठ मिळावे या हेतूने या कार्यालयाने डेमो हाऊसेस मध्ये विक्री केंद्र/ कॉप-शॉप (Co-op Shop) सुरू करण्याची संकल्पना मांडली आहे.

डेमो हाऊसेसमध्ये सुरू होणाऱ्या विक्री केंद्र/कॉप-शॉप (Co-op Shop) ची बाजारपेठ व जनतेमध्ये एक वेगळी ओळख व्हावी व राज्यात त्यांचा एक ब्रॅन्ड तयार व्हावा याकरीता या कार्यालयाने कॉप-शॉप (Co-op Shop) करीता लोगोची निर्मिती केली आहे.

**तरी या पत्रासोबत आपणास घरकुल मार्ट व कॉप शॉप लोगो पाठविण्यात येत आहेत. घरकुल मार्ट लोगो आपल्या जिल्ह्यात यापुर्वी सुरू झालेल्या व यापुढे सुरू होणा-या सर्व घरकुल मार्टवर लावण्यात यावा. तसेच कॉप शॉप लोगो प्रत्येक तालुक्यातील डेमो हाऊस मध्ये सुरू होणा-या कॉप शॉपवर लावण्यात यावा.**

सोबत :- घरकुल मार्ट व विक्री केंद्र/कॉप-शॉप (Co-op Shop) लोगो

**(डॉ.राजाराम दिघे)**
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य

**प्रत:-** **१.** मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सादर
२. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकाय यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

---

**“महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास, २०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास”**